**सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र. १.**

**मी शपथेवर कथन करतो की,**

**नाव –** दशरथ आप्पा चौगुले.

**वय** - ५३ वर्ष, **व्यवसाय** - शेती,

**राहणार.-** मेंढोली, ता. आजरा, जि. कोल्हापूर.

**सरकार पक्षातर्फे सरतपास– श्रीमती. एस. ए. म्हामूलकर, सरकारी वकील.**

१. आरोपी माझे भाऊ व भावजय आहेत. आमची घर मिळकत क्र.९०/२ आणि गट क्र.१८६ मध्ये शेती आहे. दि.२०.१०.२०२२ रोजी सायंकाळी ०५.३० वाजेच्या दरम्यान घटना घडली होती. त्यावेळी मी माझ्या मि. क्र.९०/२ च्या परडयात आई व पत्नीसह थांबलेलो होतो. त्यावेळी सिटी सर्वेचे लोक मोजणीसाठी आले होते. ते रस्त्यावरती थांबले होते. त्यांनी आरोपी क्र.१ कडे मोजणीच्या टेपचा दिलेले टोक घेऊन तो माझ्या मि. क्र.९०/२ च्या परडयात आला होता. तो त्याची घर मिळकत क्र.६५/१ च्या मोजणी सोबत माझ्या मि. क्र.९०/२ मधील परडे मोजत होता.

२. मी त्याला माझ्या परडयाची जागा मोजू नको असे सांगितले असता, त्याने हातातील टेप टाकून मला लाथाबुक्यांनी मारहाण केली होती. मला त्याच्या ताब्यातून सोडवण्यासाठी माझी पत्नी व आई आली असता, त्यांना देखील आरोपी क्र.१ ने ढकलून देऊन लाथाबुक्यांनी मारहाण केली होती. त्यानंतर त्याने उंब–यालगतचा टोणा घेऊन माझ्या डाव्या हातावर, डाव्या पायाच्या घोटयावर, उजव्या पायावर आणि पाठीवर मारहाण केली होती. त्याने माझ्या आईच्या उजव्या हातावर टोण्याने मारहाण केली होती.

३. मला, माझी पत्नी व आईला आरोपी क्र.२ ने देखील लाथाबुक्यांनी मारहाण केली होती. मारहाणीमुळे आम्ही आरडाओरडा केला असता, आरोपी क्र.१ त्याच्या पत्नीसह घरामध्ये निघून गेला होता. त्यानंतर आम्ही रिक्षा करुन पोलिस ठाण्यात आलो होतो. त्यांनी मला यादी देऊन आजरा ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी पाठवले होते. त्यांनी माझा एक्स–रे काढल्यानंतर हात फ्रॅक्चर झालेला असल्यामुळे मला गडहिंग्लज किंवा आजरा येथे खाजगी दवाखान्यात पुढील उपचार घेण्यास

सांगितले होते. त्यामुळे मी आजरा येथील देसाई हॉस्पीटलमध्ये डाव्या हाताला प्लॅस्टर केले होते. मी तेथील कागदपत्रे घेऊन पोलिसांकडे तक्रार दिली होती. आता मला मी दिलेला तक्रार दाखवली, त्यावरती माझी स्वाक्षरी असून त्यातील मजकूर बरोबर आहे. तिला **नि. क्र. पी.–२२** देण्यात येतो.

४. मला आरोपी क्र.१ ने मारहाण केलेला टोणा दाखविल्यास मी ओळखू शकतो. आता मला तो टोणा दाखवला, तो तोच आहे. त्याला **वस्तू क्र. ए** देण्यात येतो. घटनेच्या दिवशी मी राखाडी रंगाचा शर्ट व मातकट रंगाची पँट घातलेली होती. आता मला ते कपडे दाखवले, मी ते ओळखतो. त्यातील शर्टला **वस्तू क्र. बी** व पँटला **वस्तू क्र. सी** देण्यात येतो.

५. घटनेच्या दिवशी आरोपी क्र.१ ने लायनिंगचा पांढरा शर्ट आणि राखाडी रंगाची पँट घातलेली होती. आता मला ते कपडे दाखवले, मी ते ओळखतो. त्यातील शर्टला **वस्तू क्र. डी** व पँटला **वस्तू क्र. ई** देण्यात येतो. त्यावेळी आरोपी क्र.२ ने हिरव्या रंगाची नक्षी असलेली साडी आणि चॉकलेटी रंगाचा फुलांचा ब्लाऊज घातलेला होता. आता मला ते कपडे दाखवले, मी ते ओळखतो. त्यातील साडीला **वस्तू क्र. एफ** व ब्लाऊजला **वस्तू क्र. जी** देण्यात येतो. आज आरोपी न्यायालयात हजर आहेत.

**सरतपास पुर्ण.**

**<u>आरोपींतर्फे उलटतपास – श्री. ए. जी. पाटील वकील.</u>**

६. माझे बारावी पर्यंतचे शिक्षण झाले आहे. मला दोन मुले असून मुलगी सासरी व मुलगा नोकरीच्या ठिकाणी गोवा येथे राहतो. आरोपींची मुले बाहेरगावी राहत असल्यामुळे ते गावी दोघेच राहतात. आरोपी रोजगार हमीची कामे करतात. गट क्र.१८६ मध्ये पाण्याचा ओढा आहे. मला त्या जमिनीत ओढयाचे पाणी घुसून शेतीचे व झाडांचे नुकसान झाल्याची माहिती नाही. माझा व आरोपी क्र.१ चा गट क्र.१८६ च्या जागेबाबत या न्यायालयात वाद चालू असून तो प्रलंबित आहे.

७. आमच्या वडिलांनी त्यांच्या हयातीमध्ये आमच्या जमिनीची वाटणी करुन

दिलेली आहे.

प्रश्न – तुम्ही तुमच्या वडिलांनी वाटून दिल्याप्रमाणे जमिनीची वहिवाट करत नाही ?

उत्तर – आमच्या वडिलांनी चित्री प्रकल्पामध्ये जमीन जात असल्यामुळे गट क्र.१८६ मधील दोन–दोन एकर आम्हाला वाटून दिल्याबाबतची कागदपत्रे तयार केली आहेत.

८. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही वडिलांनी दिल्याप्रमाणे जमीन वहिवाटत नसल्यामुळे आमच्यात वाद होत आहेत. मी गट क्र.१८६ ची अथवा वडिलांनी दिलेल्या दोन एकर क्षेत्राची स्वतः मोजणी करुन घेतलेली नाही.

९. आमच्या संपुर्ण गावाची सिटी सर्वेची योजना आली होती. त्याप्रमाणे गावातील सर्व मिळकतींची मोजणी होणार होती. त्याबाबत सिटी सर्वे विभागाने आमच्या ग्रामपंचायतीला नोटीस दिलेली होती. त्याप्रमाणे दि.२०.१०.२०२२ रोजी सिटी सर्वेचे कर्मचारी आमच्या गावात मोजणीसाठी आले होते. ते मोजणी करत आमच्या घरापर्यंत आले होते. हे म्हणणे खरे नाही की, घटनेच्या दिवशी सिटी सर्वेचे कर्मचारी माझ्या व आरोपी क्र.१ च्या घराची मोजणी करण्यासाठी माझ्या घरासमोरच्या रस्त्यावरती आले होते.

१०. सिटी सर्वेच्या कर्मचा–यांनी आरोपी क्र.१ ला टेपचे एक टोक देऊन त्याला त्याच्या घरापर्यंत जायला सांगितल्याचे मला माहिती नाही. सिटी सर्वेचे कर्मचारी माझ्यासमोर मोजणीसाठी आले नव्हते. मला वाटून आलेले घर वडिलार्जित आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्याकडे घराच्या वाटण्या झाल्याबाबतचा कागदोपत्री पुरावा नाही. हे म्हणणे खरे नाही की, आमच्या घराला लागून आरोपी क्र.२ ने एक घर विकत घेतले असून ते तिच्या नावावरती आहे.

११. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.२ ने घेतलेले घर व माझे घर एकमेकाला लागून आहे. घटनेच्या दिवशी माझ्या घर–परडयामध्ये सिटी सर्वेचे कर्मचारी अथवा ग्रामपंचायत सदस्य मोजणीसाठी आले नव्हते. मला माझ्या घरासमोरच्या रस्त्याच्या

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

चतुःसिमा सांगता येतात. तो रस्ता मिळकत क्र.६५/१ व ६५/२ च्या पश्चिमेला आहे. साक्षीदार स्वतःहून सांगतो, त्याने मि. क्र.६५/२ खरेदी केली आहे. मी माझ्या मालकीचे सांगत असलेले मि. क्र.९०/२ च्या परडयाबाबत माझी ग्रामपंचायतीकडे नोंद नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.२ ने खरेदी केलेली मि. क्र.६५/१ माझ्या मिळकतीच्या बाजूला असून माझ्या मिळकतीतील पाणी त्या मिळकतीत जात असल्यामुळे आमच्यामध्ये भांडणे होतात.

**१२**. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात सांगितल्या प्रमाणे दि.२०.१०.२०२२ रोजी कोणतीही घटना घडलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी मला व माझ्या आई आणि पत्नीला लाथाबुक्यांनी आणि आरोपी क्र.१ ने मला उंब–या जवळच्या टोण्याने मारल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्या मारहाणीमध्ये माझा डावा हात फ्रॅक्चर झाल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही पोलिस ठाण्यात आलो असता, त्यांनी आम्हाला यादी देऊन सरकारी दवाखान्यात पाठवल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी तेथील डॉक्टरांच्या सांगण्या प्रमाणे देसाई डॉक्टरांच्या दवाखान्यात हाताला प्लॅस्टर केल्याचे खोटे सांगत आहे.

**१३**. मी पंच साक्षीदार प्रकाश दळवी यांच्याकडे टेलरिंगचे काम करत असून ते माझ्या परिचयाचे आहेत. ते माझे मित्र नाहीत. दुसरा पंच विलास कोकीतकर आमचा गाववाला आहे. हे म्हणणे खरे नाही की, वस्तू क्र. अ प्रमाणे टोणा प्रत्येक शेतक–याच्या घरात मिळतो. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या घराच्या पाठीमागे छोटी छोटी झाडे उगवलेली आहेत. मी मागील ५ ते ६ महिन्यांपुर्वी घराच्या पाठीमागे तुळस कट्टा बांधून पेरुचे झाड लावले आहे.

**१४**. माझ्या व आरोपींच्या घरामध्ये असणा–या दगडी भिंतीचे मी बांधकाम केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी वस्तू क्र. डी ते जी प्रमाणे कपडे आरोपीचे असल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, कोणतीही घटना घडलेली नसून आरोपी त्यांचा कायदेशीर हिस्सा मागत असल्यामुळे मी खोटी तक्रार दाखल

करुन खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

दिनांक – २२.०४.२०२५. (आर. पी. थोरे)

आजरा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, आजरा.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते